भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र
(दुपार)

जा.क्र. ५७६/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १६/०८/२०१७

**१) क्षुल्लक कारणावरुन भांडण करुन काठीने डोक्यावर मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक १५/०८/२०१७ चे १०.३० वा. दर. यातील फिर्यादी फुलचंद आत्माराम बन्सोड वय ५२ वर्ष, रा. ईसापुर आरोपी यास तु आमचे घरा समोर शेनखत का फेकते असे हटकले गावातील बौध्द विहाराकडे निघुन गेला व १०.३० वा दरम्यान फिर्यादी हा आपले घरी येत असतांना आरोपीने त्याचे सोबत भांडण करुन फिर्यादीचे पत्नीस व मुलीस शिवीगाळ करुन दांडयासारख्या काठीने फिर्यादीचे डोक्याचे डावे बाजुस मारुन जखमी केल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पालांदुर येथे कलम ३२४,५०४,५०६ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. कोल्हे पो.स्टे. पालांदुर हे करीत आहेत.

**२) किटक नाशक औषध प्राशन केल्याने औषधोपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु . :–**

दिनांक १४/०८/२०१७ चे ११.०० वा. दर. यातील मृतक उमेश मिलींद टेंभुर्णे वय ३२ वर्ष रा. चकारा याने आपले घरी किटक नाशक औषध प्राशन करुन त्याची प्रकृती बिघडल्याने त्यास औषधोपचारा करीता प्रथम ग्रा.रु. अडयाळ येथे भरती केले असता तेथील डॉ. ने सा. रु. भंडारा येथे रेफर करुन त्यास सा. रु. भंडारा येथे भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने डॉ. मेमो वरुन पो. स्टे. भंडारा येथे मर्ग क्र. ००/१७ क. १७४ जाफौ. चे कागदपत्र पोस्टे अडयाळ येथे प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. साठवणे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम १७४ जाफौ. प्रमाणे नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. गिन्हेंपुजे पोलीस स्टेशन अडयाळ हे करीत आहेत.

**३) सर्पदंशाने महिलेचा मृत्यु. :–**

दिनांक १५/०८/२०१७ चे १५.०० वा. दर. यातील मृतक सौ. वनिता तिमाजी मेहंदले वय ६० वर्ष, रा. आसोला ही निंदनाचे कामाने मजुरीने शेतावर गेली असता तीला कोणत्यातरी विषारी सापाने उजवे हाताचे बोटावर चावा घेतल्याने तीला औषधोपचारा ग्रा. रु. लाखांदुर येथे भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने फिर्यादी रोहीदास तिमाजी मेहंदले वय ३५ वर्ष, रा. आसोला यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम १७४ जाफौ. प्रमाणे मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. भलावी पोलीस स्टेशन लाखांदुर हे करीत आहेत.

**४) औषधोपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु . :–**

दिनांक १४/०८/२०१७ चे १७.३० वा. दर. यातील मृतक मोरेश्वर मुंशी पंचबुधे वय ५५ वर्ष, रा. शिवनी मोगरा ची अचानक प्रकृती बिघडल्याने त्यास दिनांक १४/०८/२०१७ ला उपचारा कामी आकस्मीत विभाग सा. रु. भंडारा येथे भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने डॉ. मेमो वरुन पो.स्टे. भंडारा येथे क्र. ००/१७ कलम १७४ जाफौ चे कागदपत्र प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. राऊत यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम १७४ जाफौ. प्रमाणे नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सार्वे पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहेत.

**५) प्रकृती खराब झाल्याने उपचारा दरम्यान मृत्यु. :–**

दिनांक १५/०८/२०१७ चे ०७.४५ वा. दर. यातील मृतक रामु नत्थुजी बोरकर वय ५६ वर्ष, रा. भंडारा याने दारु पिल्याने त्याची प्रकृती खराब झाल्याने त्यास दिनांक १४/०८/२०१७ ला सा. रु. भंडारा येथे वार्ड क्र.०९ मध्ये भरती असतांना उपचारा दरम्यान दिनांक १५/०८/२०१५ ला मरण पावल्याने डॉ. मेमो वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १७४ जाफौ. प्रमाणे मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. भलावी पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

६) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–

दिनांक १५/०८/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ५१ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून तीन सिटर वाहनांवरती २३ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती २८ केसेस करण्यात आलेल्या आहे.

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.